।। अंतरी पेटवू ज्ञानज्योत ।।

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव-४२५ ००१.

जा. क्र. उमावि/९२/६/३५/ दिनांक : ३. ८. १९९२.

प्रति,

मा. प्राचार्य,

[कला शाखा असणाऱ्या सर्व महाविद्यालयाचे मा. प्राचार्य]

विषय :- अभ्यासक्रमांतील सुधारणा-
वाङ्मय शाखा [कला विद्याशाखा आणि मानस, नीती व समाज विज्ञान विद्याशाखा].

संदर्भ :- उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे पत्र क्र. उमवि/९२/६/३५/६८२५, दि. २९. ७. ९२.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये वाङ्मयशाखा [ कला विद्याशाखा आणि मानस, नीती व समाज विज्ञान विद्याशाखा] अभ्यासक्रमांतील सुधारणा याकरिता भरविण्यांत येणाऱ्या कार्यशाळेचा संपूर्ण तपशील आपणाकडेस पाठविण्यांत आलेला आहे. त्या संदर्भात अधिक माहिती-साठी सोबत सुधारित अभ्यासक्रमाचा मसुदा आपल्या माहितीसाठी पाठवित आहे. कळावे ही विनंती.

आपले स्नेहांकित

प्रा. डॉ. सु. ब. शहा
अध्यक्ष
कला विद्याशाखा

प्रा. डी. एच. महाजन
अध्यक्ष
मानस, नीती व समाजविज्ञान विद्याशाखा

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव.

डीपी./

[illegible]

इकॉनॉमिक टाईम्स मध्ये श्री इंद्रनील घोष यांच्या "आपल्या देशातील शाळा आणि महाविद्यालयातून विद्यार्थ्यांना औद्योगिक क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या गोष्टींचे शिक्षण खरोखर दिले जात आहे का ? या विषयावर आलेल्या लेखाचा मुक्त अनुवाद.

---

"आधुनिक जीवन संदर्भात दुर्लक्षित केलेला विचार"

गेल्या वर्षी मुंबई येथील कॅम्पीयन शाळेच्या विद्यार्थ्यांना अहमदाबाद येथील इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट दाखविण्यासाठी नेण्यात आले होते. हे विद्यार्थी तेथे सहल म्हणून गेले नव्हते तर इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट या संस्थेमध्ये कोणते विविध अभ्यासक्रम शिकविले जातात. त्या ठिकाणी कोणत्या सुविधा विद्यार्थ्यांना दिल्या जातात आणि तसेच संस्थेच्या विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षा आहेत, हे सर्व विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात दाखविण्यात आले.

या सहलीमुळे विद्यार्थ्यांना वास्तवतेवर आधारीत-औद्योगिक क्षेत्रातील वास्तवता- शिक्षण म्हणजे काय व ते कसे असते याची संपूर्ण कल्पना आली. या शाळेमध्ये सबंध वर्षभर वेगवेगळ्या नामांकित कंपनीतील उच्च अधिकाऱ्यांना विद्यार्थ्यांसमोर भाषणासाठी बोलाविले जाते. दुर्दैवाने सर्वच शाळा या कॅम्पीयन स्कूल सारख्या नसतात म्हणून १५ ते २१ वयोगटातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना औद्योगिक क्षेत्रात व्यवसाय कसा असतो, अपेक्षा काय असतात आणि कठोर वास्तवता काय असते याची अजिबात कल्पना नसते.

मुंबईतील एका महाविद्यालयातील वाणिज्य शाखेतील १६ वर्षाच्या विद्यार्थ्याला औद्योगिक जग म्हणजे काय हे अजिबात माहित नाही. औद्योगिक क्षेत्रात प्रशासन हेच सर्वात महत्वाचे आहे असे त्याला वाटते. हे अज्ञान बऱ्याच विद्यार्थ्यांमध्ये दिसून येते. म्हणून औद्योगिक क्षेत्रात ज्यांना [illegible] टिकूच शकत नाहीत.

दिल्ली येथील इंजिनिअरींगची पदवी घेतलेला एक तरुण एका चांगल्या कंपनीत नोकरीला लागतो. तेव्हां त्याच्या असे लक्षात येते की, त्याला नोकरीमध्ये तांत्रिक कामापेक्षा व्यवस्थापनाचे काम जास्त आहे. तो पटकन ती नोकरी सोडतो आणि दिल्ली विद्यापीठाच्या व्यवस्थापन विभागात प्रवेश घेतो. तेथे त्याला समजते की त्याला आर्थिक गोष्टींची मनापासून आवड आहे. म्हणून नोकरच तो एका बँकेत आजच्या आवडीची नोकरी करणार आहे. त्या क्षेत्रात त्याला चांगले यश मिळेल असा आत्मविश्वास वाटतो.

सध्याच्या तरुणांमध्ये हा जो गोंधळ आहे त्याचे कारण काय असावे? देशातील शाळा आणि महाविद्यालयातून आजही पारंपारीक पध्दतीवर आधारीत जुने अभ्यासक्रम शिकविले जातात. त्यामुळे औद्योगिक क्षेत्रामध्ये नेमके विद्यार्थ्यांकडून काय अपेक्षित आहे याकडे दुर्लक्ष केले गेले आहे. आजच्या जगामध्ये राजकीय आणि आर्थिक बदल हे फार झपाट्याने होत आहेत. परंतु आपली शिक्षण पध्दती आपण काळानुसार बदलण्यास तयार नाही.

....२/-

विद्यापीठांमध्ये आजही पारंपारिक अभ्यासक्रम शिकवले जातात. शिक्षकांनी अभ्यासक्रमाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलणे आवश्यक आहे. अभ्यासक्रम हेच उद्दिष्ट न मानता तो एक जीवनाकडे भरारी मारण्याचा बिंदू आहे हे लक्षात ठेवले पाहिजे आणि तेथून आपण जीवनात प्रगती केली पाहिजे.

आज आपणास असे दिसते की, व्यवस्थापन संस्थामधून विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षण आणि कंपन्यांचे विद्यार्थ्यांकडून अपेक्षित असलेले ज्ञान यात फार मोठी तफावत दिसून येते. म्हणून व्यवस्थापनाची पदवी घेतलेला विद्यार्थी देखील आपल्या क्षेत्रामध्ये कमी पडतो. औद्योगिक क्षेत्रामध्ये विविध शाखांमध्ये नेमके कोणते काम करावे लागते याचे ज्ञान जर आपण विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले तर ते आपल्या कामामध्ये यशस्वी होऊ शकतील.

सध्याच्या शिक्षण पध्दतीचा ठपका केवळ शैक्षणिक संस्थावर ठेवून चालणार नाही. कारण आपणास असे दिसते की विद्यापीठ आणि उद्योग धंदे यांच्यामध्ये काहीच संबंध राहिलेला नाही. जो पर्यंत उद्योगधंदे व कारखानदार हे तरुण आणि बुध्दिवान विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधणार नाहीत तोपर्यंत परिस्थिती सुधारणार नाही. याबाबतीत उद्योगधंद्यांनी थोडा पुढाकार घेतला पाहिजे.

आपली शिक्षण पध्दती ही वास्तवतेवर आधारलेली असली पाहिजे आणि विद्यार्थी व उद्योगधंदे यांनी परस्परांशी संपर्क ठेवला पाहिजे. नोकरीस उपयुक्त अशी शिक्षण पध्दती आपण अवलंबिली पाहिजे. मोठमोठ्या शहरांतून काही प्रसिध्द शाळा हा प्रयोग करत आहेत. विद्यार्थ्यांना खेळणी तयार करण्याच्या कारखान्यात किंवा प्लॅस्टिक कारखान्यात नेऊन प्रत्यक्ष काम कसे चालते हे त्यांना दाखविले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये असलेल्या सुप्तशक्तींना योग्य तो वाव मिळतो व ते आपल्या आवडीनुसार काम करून जीवनात यशस्वी होऊ शकतील याकरता पालक, शिक्षण संस्था, विद्यापीठ व उद्योगधंदे या सर्वांनी एकत्रित मिळून प्रयत्न केले पाहिजेत. सध्याच्या गोंधळलेल्या तरुणपिढीला योग्य मार्गदर्शन करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे. ती आपण पार पाडली पाहिजे.

वरील सर्व गोष्टींचा परामर्ष घेतल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते व ती म्हणजे शालेय व महाविद्यालयीन स्तरावर असलेले अभ्यासक्रम बदलणे अपरिहार्य आहे. अभ्यासक्रम जीवनाभिमुख करणे ही काळाची गरज आहे. हे जर आपण केले नाही तर तरुण पिढी आपल्याला कधीच माफ करणार नाही हे विसरता कामा नये.

* * * * *

नि...